॥ सा विद्या या विमुक्तये ॥
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
राष्ट्रीय सेवा योजना NATIONAL SERVICE SCHEME
Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

दिनांक : १२/०८/२०२५

जा.क्र.: रासेयो/२०२५–२६/८३

## परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: "हर घर तिरंगा" अभियान साजरा करणे बाबत.**
**संदर्भ: १) मा. जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांचे क्र.२०२५/सा.शा.१/हर घर तिरंगा अभियान/प्रक्र, दिनांक ०८/०८/२०२५ रोजीचे पत्र.**
**२) सहायक संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.सां.का.सं./३६५६, दिनांक ०१/०८/२०२५.**
**३) कक्ष अधिकारी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण ८२२५/प्र.क्र.४०७/सां.क.४, दिनांक ०४/०८/२०२५**

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. अन्वये मा. राहुल कर्डिले, जिल्हाधिकारी, नांदेड यांनी दिनांक ०२ ऑगस्ट २०२५ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालवधीत **"हर घर तिरंगा"** अभियानांतर्गत विविध कार्यक्रम/उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी केंद्र शासनाकडून सुचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुषंगाने वेगवेगळया कार्यालयांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत उपरोक्त संदर्भ क्र. १ व २ च्या पत्रान्वये निर्देश देण्यात आले आहेत.

**"हर घर तिरंगा"** हा कार्यक्रम संपूर्ण देशामध्ये दिनांक ०२ ऑगस्ट २०२५ ते दिनांक १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत साजरा करण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत विविध स्पर्धा/कार्यक्रम/उपक्रम हाती घ्यावयाचे असून, सदरचे अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी खालील प्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत. ज्यामध्ये खालील प्रमुख तीन टप्पे निश्चित करण्यात आले आहेत.

**(अ) पहिला टप्पा (०२ ते ०८ ऑगस्ट २०२५) :** या कालावधीत जे कार्यक्रम/उपक्रमात भोवती, शाळा स्तरावरील जाणीव जागृती, लोकसहभाग वातावरण निर्माण करणे अशा प्रकारचे उपक्रम राबविणे आवश्यक आहेत. त्याशिवाय सोबतच्या सादरीकरणाप्रमाणे सर्व उपक्रम/कार्यक्रम राबविणे आहे.

**(ब) दुसरा टप्पा (०९ ते १२ ऑगस्ट २०२५) :** या कालावधीत विविध कार्यवाहीचा तपशील या सोबतच्या सादरीकरणामध्ये नमूद करण्यात आला आहे.

**(क) तिसरा टप्पा (१३ ते १५ ऑगस्ट २०२५) :** हा शेवटचा आणि महत्वाचा टप्पा आहे. यामध्ये प्रत्येक घरावर राष्ट्रध्वज फडकविणे अभिप्रेत आहे, त्या दृष्टिकोनातून संबधित शासकीय विभागांनी/कार्यालयांनी या सोबतच्या सादरीकरणामधील निर्देशानुसार कार्यवाही करावयाची आहे.

**सदरील अभियानांतर्गत कार्यवाही करण्यासाठी खालीलप्रमाणे सुचना देण्यात आलेल्या आहेत.**

- प्रस्तुत विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयात राष्ट्रध्वज फडकविण्यात यावा.
- आपल्या जिल्हयामध्ये आवश्यक राष्ट्रध्वजाची मागणी किती असेल याचा अंदाज घ्यावा व त्यानुसार बचत गट व इतर व्यवसायिकांमार्फत राष्ट्रध्वजाचा पुरेसा पुरवठा होईल हे सुनिश्चित करावे. आवश्यक ती मदत हवी असल्यास केंद्र शासनाच्या पॅनालवरील व्हेंडरची नावे पुढिल प्रमाणे आहेत Kasturi Enterprises, Mumbai, (9924984410), Elegsa Flags and Garments, Mumbai (Amit Manjrekar 9820515598) व Suguna creation, Goregaon Mumbai

(Chandu (6353-944249) राष्ट्रध्वज निर्मिती व विक्रीमध्ये स्वंयसहाय्यता बचत गटांना विशेष प्राधान्य देण्यात यावे.

- सर्व संलग्नित महाविद्यालय आणि प्रस्तुत विद्यापीठात तिरंगा रोषणाई करणे अपेक्षित आहे.
- विविध प्रकारच्या स्पर्धा जसे **वक्तृत्व व निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, राखी** निर्माण स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात, या स्पर्धा तिरंगाविषयक आशयाशी संबधित असावेत.
- सर्व शासकीय संकेत स्थळावर **"हर घर तिरंगा"** विषयक मजकूर आणि संबधित लोगो असावेत.
- यावर्षी "हर घर तिरंगा" हर घर स्वच्छता, स्वतंत्रता का उत्सव, स्वच्छता के संग" या घोषवाक्यासह "हर घर तिरंगा" अभियान साजरे करावयाचे आहे. त्यामुळे या संदर्भाने स्वच्छ **पाणी व परिसर स्वच्छता या मोहिमा हाती घ्यावयाचे आहेत**, या उपक्रमाचे महत्व लक्षात घेता, सर्व शाळांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये या उपक्रमांची माहिती देण्यात यावी.
- या अभियानामधील आणखी एक महत्वाची बाब म्हणजे सदर अभियानाची माहिती सर्व नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी स्वंयसेवकांनी पुढे यावयाचे आहे..यासाठी स्वंयसेवकांनी हर घर तिरंगा या संकेत स्थळावर जाऊन नोंदणी करणे आवश्यक आहे. याकरिता रा.से.यो. महाविद्यालयीन विद्यार्थी व इतरांना स्वंयसेवक म्हणून नोंदणी करता येईल.
- या "हर घर तिरंगा" अभियानाच्या अनुषंगाने "तिरंगा मेला" याचेही आयोजन करण्याबाबत सुचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.
- "हर घर तिरंगा" अभियानांतर्गत जे कार्यक्रम/उपक्रम साजरे होत आहेत त्यांचे कार्यक्रम पूर्व व पश्चात प्रचार प्रसिध्दी करावी त्यासाठी जिल्हा माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.
- तिरंगासह सेल्फी सारख्या उपक्रमांवर विशेष लक्ष देऊन नागरिकांनी आपल्या सेल्फी संकेतस्थळावर अपलोड करणेही महत्वाचे आहे.
- राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वंयसेवक विद्यार्थ्यांना हर घर तिरंगा डॉट कॉम वर या विद्यार्थ्यांचे रजिस्ट्रेशन करून घेणे आवश्यक आहे.
- या कार्यक्रमाची छायाचित्रे राज्य समन्वयकाकडे पाठवणे आपल्या स्तरावरून छायाचित्र आपलोड करणे या बाबीही या अभियानात महत्वाच्या आहेत.
- अभियान संपन्न झाल्यानंतर या विषयीचा अहवाल सादर करणे ही आवश्यक आहे.
- "हर घर तिरंगा" अभियानांतर्गत केंद्र शासनाकडून आतापर्यंत आलेल्या सुचना आपणापर्यंत अग्रेषित करण्यात आलेल्या आहेत यापुढेही वेळोवेळी ज्या सुचना प्राप्त होतील त्या आपणापर्य्रत अग्रेषित करण्यात येतील. तोपर्यंत या सुचनांच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही सुरू करण्यात यावी.
- या अभियानासाठी शासनाकडून कोणतेही निधी उपलब्ध करून देण्यात येणार नसून प्रत्येक विभागांनी/कार्यालयांनी आपापल्या आर्थिक तरतुदीमधून सदर अभियान साजरे करावयाचे आहे.
- "हर घर तिरंगा" या अभियानांतर्गत एक केंद्री संपर्कासाठी सांस्कृतिक कार्य संचलनालयाच्या स्तरावर एक कक्ष निर्माण केला आहे. श्री संदीप बलखंडे, सहायक संचालक, भ्रमणध्वनी क्र. ९७६३०६८०८३ यांची या कक्ष प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या अभियाना दरम्यान काही समस्या/प्रश्न उद्भवल्यास सदर कक्षाशी संपर्क साधण्यात यावा.
- अधिक माहितिसाठी/स्वंयसेवक नोंदणीसाठी/सेल्फी अपलोड करण्यासाठी व तपशीलवार माहितीसाठी https://harghartiranga.com या संकेत स्थळास भेट दयावी.

तरी त्यानुषंगाने रा.से.यो संलग्नीत महाविद्यालयांनी आपल्या महाविद्यालयात उपरोक्त पणे नमुद केलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करून **"हर घर तिरंगा"** हे अभियान यशस्वीपणे राबविण्यात यावे व साजरा केलेल्या विविध उपक्रमांचे फोटो, व्हिडीओ, व अहवाल शासनास पाठवावयाचा असल्यामुळे रा.से.यो. विभागाच्या **nss@srtmun.ac.in** या ई—मेल वर पाठविण्यात यावा ही विनंती.

प्रा. डॉ. मारोती गायकवाड
**संचालक**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. प्र.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.